# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 04/07/2020 (शनिवार)

(दुपार)

### जबरी संभोग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– दिनांक 21/02/2020 ते दिनांक 29/02/2020 चे सुमारास फिर्यादी यांची 16 वर्षीय मुलगी पिडीता हि घरी एकटी हजर असता आरोपी नामे– रजनिशकुमार प्रेमलाल मिश्रा, वय 30 वर्ष, रा. भारकस याने तिला मारण्याची धमकी देवुन जबरदस्तीने शारीरिक सबंध प्रस्थापीत केले. तसेच आरोपीने पुन्हा 8 दिवसानंतर मारण्याची धमकी व बदनामीची धमकी देत पीडिते सोबत वारंवार शारीरिक सबंध प्रस्थापित केल्याने पीडीता ही 4 महिण्याची गर्भवती झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एन), 506 भादंवि. सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक श्री. आरती उघडे 8421655301 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 12 कि मी अंतरावर मौजा मांढळ येथे दिनांक 02/07/2020 चे 13.39 वा. ते दिनांक 02/07/2020 चे 17.18 वा. सुमारास फिर्यादी नामे– चेतना विजय इटनकर, वय 27 वर्ष, रा. मांढळ यांचा मुलगा दिव्यांग असल्याने त्याचे उपचाराकरिता 03 लाख रू ची आवश्यकता होती. त्यामुळे फिर्यादीने बजाज फायनन्स कंपनीकडे दि 01/07/2020 रोजी ऑनलाइन लोनकरीता अर्ज केला होता. दि. 02/07/2020 रोजी फिर्यादीच्या मोबाईलवर अज्ञात आरोपीने कॉल करून म्हटले की, 'मी, बजाज फायनन्स मधुन बोलतो तुमचा आधार कार्ड पॅन कार्ड व बॅक डीटेल पाठवा.' यावरून फिर्यादीने आरोपीच्या नंबरवर कागदपत्रे व्हॉटस ॲपव्दारे पाठविले. त्यानंतर पुन्हा फिर्यादीस आरोपीने लोन प्रोसीजर करिता 3,500/–रू. लागणार आहे, 'त्याकरीता तुम्ही एसबीआय खात्यात सदरची रक्कम जमा करून दया' असे म्हटले. त्यावरून फिर्यादीने आपले गुगल पे व्दारे 3,500/– रू. आरोपीच्या खात्यात जमा केले. त्यानंतर आरोपीने मागणी केल्याप्रमाणे वेळोवळी पुन्हा फिर्यादीने बॅक प्रोसेसींग फीचे 9,650/–रू., टीडीएस फीचे 12,500/–रू. गुगल पे व्दारे रक्कम आरोपीचे खात्यात जमा केली. त्यानंतर पुन्हा आरोपीने ॲग्रीमेंट फीचे 19,200/–रू. लागते व त्यानंतर वारंवार फोनव्दारे पैशाची मागणी करून परत जीएसटीचे 24,600/–रू. पाठवा असे म्हटल्याने व फिर्यादीचे अकाउंट मध्ये तेवढे पैसे शिल्लक नसल्याने 12,300/–रू. असे गुगल पे व्दारे एकुण रक्कम 69,450/–रू. आरोपीने आपले खात्यात जमा करून फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मंडवाले 9763234546 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर